# नियमित दिवाणी दावा क्रमांक १३७/२०२५ मधील नि.क्र.२८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, वादी यांनी प्रतिवादी क्र. १८ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दिला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.१८ नामदेव मारुती जाधव हे दिनांक २१.१०.२०२४ रोजी दावा दाखल करण्यापूर्वी मयत झाले आहेत. त्याची माहिती दावा दाखल करतेवेळी वादी यांना नव्हती. सदर प्रतिवादी क्र. १८ चे पूर्वीच्या दाव्यात प्रतिवादी क्र. १४ होते. वादी यांना सदर दाव्याचे समन्स बजावणीसाठी गेल्यानंतर ते मयत असल्याची माहिती मिळाली. सदर दाव्याचा गुणावगुणावर निर्णय होण्यासाठी प्रतिवादी क्र. १८ चे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. सबब प्रतिवादी क्र.१८ चे वारसांचे नावे प्रतिवादी म्हणून सामील करावे.

२. प्रस्तुतचे अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे देऊन हरकत नोंदविली. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादी यांनाी दावा दाखल करताना सर्व माहिती घेऊनच दावा केला आहे. त्यामुळे प्रतिवादी १८ मयत झाल्याची माहिती वादी यांना नव्हती यावर विश्वास ठेवता येणार नाही. सबब, सदर अर्ज नामंजूर करावा.

३. प्रतिपक्षांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी क्र. १८ चे वारस दाव्यात दुरुस्तीने अभिलेखावर घेण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने जाहीर ठरावाकरिता व निरंतर ताकीदिकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१८ नामदेव मारुती जाधव हे दिनांक २१.१०.२०२४ रोजी दावा दाखल करण्यापूर्वीच मयत झाले आहेत व त्यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. अर्जात नमूद व्यक्ती मयताचे वारस आहेत. त्यांना दावा पुढे चालविण्याचा अधिकार आहे. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही अगर दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१८ चे वारस सदर दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून अभिलेखावर घेण्यात येत आहे. सदर दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसाचे आत करावयाची आहे.

३. वादीने योग्य त्या दुरुस्तीसह दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.09.12 15:54:36 +0530

( व्ही. बी. घाडगे )

दिनांकः- १२.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.